# नियमीत दिवाणी दावा क्र. २२/२०१६ मधील नि. ७९ वरील आदेश

सीएनआर–एमएचएसएन १२–००००९७–२०१६

(पोपट बाळीशा ऐतवडे वि. रघूनाथ आनंदा कांबळे वगैरे)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.१ ते ४ व ७ यांनी त्यांचेविरुद्ध झालेला विना कैफियतीचा हुकूम रद्द व्हावा यासाठी केलेला आहे.

२. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्जातील प्रतिवादी नं.१ ते ४ व ७ हे आपले विधिज्ञामार्फत हजर झालेले आहेत. परंतू सदर कामी वेळेत प्रतिवादी नं.१ ते ४ व ७ यांनी कैफियत दाखल केलली नाही, म्हणून यातील प्रतिवादी नं.१ ते ४ व ७ विरुध्द विनाकैफियत आदेश पारीत झालेला आहे. सदर कामातील प्रतिवादी नं. १ ते ४ हे अल्पशिक्षीत शेतकरी असून, प्रतिवादी क्र. ७ या महिला आहेत. प्रतिवादी क्र. ५ या आजारी होत्या. त्यामुळे त्यांची सेवसुश्रुषा करणे याची जबाबदारी प्रतिवादी क्र. १, २ व ४ यांचे वरती होती. प्रतिवादी क्र. ३ संभाजी आनंदा कांबळे हे नोकरीनिमित्त परगावी राहत असलेने सर्व प्रतिवादींना एकत्र येवून चर्चा करून वकील सांगतात त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करणे अशक्य झाले होते. त्यामुळे या कामी मे. कोर्टात हजर राहून त्यांना कैफियत दाखल करता आली नाही. सदर कामी प्रतिवादी नं.१ ते ४ व ७ यांनी जाणीवपूर्वक हलगर्जीपणा, निष्काळजीपणा केलेला नव्हता. त्यामुळे प्रतिवादी नं.१ ते ४ व ७ यांना कायदा मुदतीत म्हणणे / कैफियत

दाखल करणेस झालेल्या विलंबाची माफी होवून विना कैफियत आदेश रद्द करण्यात यावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

३. वादीने त्याच अर्जावर त्यांचे म्हणणे दिले. त्यामध्ये वादीने कथन केले की, प्रतिवादी यांना जास्तीत जास्त कॉस्ट करुन अर्ज मंजूर करणेत यावा.

४. प्रतिवादीच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. सदर कामी जर प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर करणेत आला तर त्यांचे पैशाने न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. परंतु सदरचा अर्ज मंजूर झाला तर वादी यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी उपलब्ध असणार आहे. त्याचप्रमाणे दाव्याच्या निराकरणासाठी त्याची मदत होणार आहे. याकामी प्रतिवादीतर्फे कथनाचा विचार करता सदरचा अर्ज वादींना खर्च देणेचे अटीवर मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | प्रतिवादी नं.१ ते ४ व ७ यांचा नि. ७९ चा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | प्रतिवादी नं. १ ते ४ व ७ यांचेविरुद्ध झालेला विना कैफियत आदेश सेट असाईड करण्यात येतो. संबंधित प्रतिवादी क्र. १ ते ४ व ७ यांनी वादीला रुपये ५,०००/– कॉस्ट द्यावी. |

| | |
|---|---|
| ३. | तसेच प्रतिवादी नं.१ ते ४ व ७ यांनी पुढील तारखेपर्यंत कॉस्टची रक्कम जमा करावी. जमा न केल्यास योग्य ते आदेश पारित केले जातील याची नोंद घ्यावी. |

IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN

Digitally signed by IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2025.02.01 13:24:15 +0530

**पलुस.** **(आय. ए. वाय. ए. खान)**

**दिनांक– ३१/०१/२०२५** **सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर पलूस**

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. Jyoti A. Salunkhe<br>Stenographer Grade III |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 31/01/2025 |
| Signed by P. O. on | : | 31/01/2025 |
| Uploaded on | : | 01/02/2025 |